Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। बुधवार, दि. ०८ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक १ । पाने २।
DIGITAL EDITION




दोन युगपुरूषांचे नाते
(पान २ वर)

» Selected

### नीलमची झुंज संपली

सातारा । कराड तालुक्यातील वडगाव (उंब्रज) येथून अमेरिकेत शिक्षणासाठी गेलेल्या लाडक्या लेकीची तब्बल १४ महिन्यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली. नीलम शिंदेचे शनिवारी (२८ मार्च) रोजी निधन झाले. आता तिचे अंतिम दर्शन वडिलांना व्हिडीओ कॉलवरून घ्यावे लागणार आहे.नीलम तानाजी शिंदे (वय ३५) ही तरुणी अमेरिकेत एमएसच्या शेवटच्या वर्षाचे शिक्षण घेत होती. योगा क्लासवरून सायकल बाइकवरून होस्टेलकडे परतत असताना भरधाव कारने तिला जोरदार धडक दिली.

---

### 5000 प्राध्यापकांच्या पदभरतीला मान्यता

नागपूर । गेल्या अनेक वर्षापासून राज्यातील अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची हजारो पदे रिक्त असल्याने शैक्षणिक कामांवर परिणाम होत आहे. या समस्येतून मार्ग काढण्याचा प्रयत्न सरकारने केला असून राज्यातील प्राध्यापकांच्या ५,०१२ पदांच्या भरतीला मंजुरी दिली आहे.अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची २० हजारांवर पदे रिक्त आहेत. केवळ नागपूर विभागातच प्राध्यापकांची २,५०० च्यावर पदे रिक्त आहेत.

## राज्य मंत्रिमंडळाचे जनहिताचे पाच ऐतिहासिक निर्णय

# ई-पंचनामा ते कर्जसवलतीपर्यंत मोठे निर्णय!

### योजन आणि आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात बदल; सामान्य नागरिक, शेतकरी आणि उद्योगांना दिलासा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई** राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देत सामान्य नागरिकांच्या अडचणी कमी करण्याच्या दृष्टीने राज्य मंत्रिमंडळाने आज (७ एप्रिल) झालेल्या बैठकीत पाच महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत माहिती तंत्रज्ञान, ऊर्जा, नियोजन आणि आपत्ती व्यवस्थापन या प्रमुख विभागांशी संबंधित धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. या निर्णयांमुळे प्रशासन अधिक गतिमान होणार असून, नागरिकांना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक सुलभ सेवा मिळणार आहे.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी झेप राज्यात स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग स्थापन करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या ध्येयाच्या दिशेने हे पाऊल निर्णायक मानले जात आहे. सध्याचे



### ई-पंचनामा आणि डिजिटल सुविधा अधिक सक्षम

ई-पंचनामा प्रणाली अधिक प्रभावी करण्यासाठी तांत्रिक सुधारणांनाही मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे शेतीतील नुकसानाचे तात्काळ आणि अचूक मूल्यांकन करता येणार आहे. शेतकऱ्यांना मदत मिळण्याची प्रक्रिया जलद होणार असून, पारदर्शकतेतही वाढ होईल.

माहिती तंत्रज्ञान संचालनालय आता आयुक्तालयात रूपांतरित होणार असून, मंत्रालयीन स्तरापासून जिल्हास्तरापर्यंत नवीन आयटी संवर्ग (IT Cadre) तयार केला जाणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील डिजिटल गव्हर्नन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासनाला मोठी चालना मिळणार आहे. शासकीय कामकाज अधिक पारदर्शक, जलद आणि परिणामकारक करण्याचा उद्देश यामागे आहे.

**नियोजन विभागात तंत्रज्ञानाचा वापर वाढणार**

नियोजन विभागांतर्गत महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (MRSAC) चे रूपांतर कंपनीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोसायटी कायद्याऐवजी कंपनी कायद्यानुसार याची पुनर्रचना होणार असून, यामुळे विविध विकास प्रकल्पांना गती मिळेल. रस्ते माहिती प्रणाली, नगररचना, जलयुक्त शिवार, पाणलोट विकास, भूजल व्यवस्थापन, खनिज अभ्यास यांसारख्या प्रकल्पांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होणार आहे. याचबरोबर 'महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर' (महाजिओटेक) या नव्या कंपनीची स्थापना करण्यात येणार आहे.

भू-स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासन अधिक अचूक आणि जलद निर्णय घेऊ शकेल. विद्यार्थ्यांसाठी, संशोधकांसाठी आणि उद्योजकांसाठी नवीन संधी उपलब्ध होणार आहेत.

**ऊर्जा क्षेत्रात महत्त्वपूर्ण आर्थिक सुधारणा**

ऊर्जा विभागाने महावितरण कंपनीच्या आर्थिक पुनर्रचनेचा मोठा निर्णय घेतला आहे. सुमारे ३२,६७९ कोटी रुपयांच्या शासन हमी असलेल्या कर्जासाठी भांडवली बाजारातून निधी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

याशिवाय कृषी वीज वितरण व्यवसायाचे विभाजन (Agri Demerger) करण्यात येणार असून, महावितरण कंपनीला शेअर बाजारात सूचीबद्ध करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. या निर्णयामुळे कंपनीची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल आणि वीज वितरण अधिक कार्यक्षम होण्याची अपेक्षा आहे.

### आपत्ती व्यवस्थापनात मोठी मदत योजना

आपत्ती व्यवस्थापन विभागांतर्गत 'महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम' (MRDP) राबविण्यास मंजुरी देण्यात आली आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने १६५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. या योजनेतून आपत्तीग्रस्त नागरिकांना गृहकर्जात सवलत, तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSME) कर्जसहाय्य व विमा संरक्षण दिले जाणार आहे. पूरग्रस्त भागांमध्ये विशेष उपाययोजना करण्यात येणार असून, कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी आणि कृष्णा खोऱ्यातील पूरस्थिती नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक आराखडे तयार केले जाणार आहेत.

### जनतेसाठी दिलासा देणारे निर्णय

राज्य मंत्रिमंडळाच्या या निर्णयांमुळे प्रशासन अधिक आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित होणार आहे. शेतकरी, उद्योग, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी हे निर्णय दिलासादायक ठरणार आहेत. विशेषतः आपत्तीग्रस्तांना आर्थिक मदत, कर्जसवलती आणि विमा संरक्षण मिळणार असल्याने सामाजिक सुरक्षिततेची भावना अधिक बळकट होईल. एकूणच, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेले निर्णय हे राज्याच्या दीर्घकालीन विकासासाठी महत्त्वाचे मानले जात आहेत. डिजिटलायझेशन, आर्थिक सुधारणा आणि आपत्ती व्यवस्थापनातील सुधारणा यामुळे महाराष्ट्र अधिक सक्षम, सुरक्षित आणि प्रगत दिशेने वाटचाल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

---

## 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

### आता प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा थेट ग्रामस्थांच्या दारापर्यंत

जन सम्राट टाईम्स

**मुंबई** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राज्य शासनाच्या 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मंगळवारी जागतिक आरोग्य दिनानिमित्त शुभारंभ करण्यात आला. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना आहे. ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि लोकाभिमुख करण्यासाठी सरकारने हे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या अभियानाचा



मुख्य उद्देश प्रत्येक गाव आरोग्यदृष्ट्या स्वयंपूर्ण करणे हा आहे. मोहिमेअंतर्गत गावागावांत आरोग्य शिबिरे आयोजित करून नागरिकांची आरोग्य तपासणी, आजारांचे वेळेवर निदान आणि उपचार यांवर भर दिला जाणार आहे. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा थेट ग्रामस्थांच्या दारापर्यंत पोहोचवणे, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. लोकसहभागातून हे अभियान यशस्वी करण्याचे आवाहन यावेळी मुख्यमंत्र्यांनी केले. शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचल्यास ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत हे अभियान संपूर्ण राज्यात प्रभावीपणे राबवले जाणार आहे.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह अन्य मंत्रिमंडळ सदस्य उपस्थित होते.

---

### होर्मुझ खुली करण्याची शेवटची आशा संपली!

मुंबई : होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेत मांडण्यात आलेला प्रस्ताव मंजूर होऊ शकला नाही. या प्रस्तावावर झालेल्या मतदानावेळी चीन आणि रशिया व्हिटोचा वापर केला.

त्यामुळे होर्मुझ खुली करण्याच्या मोठ्या प्रयत्नात निराशाच हाती आली आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेत होर्मुझ सामुद्रधुनीच्या सुरक्षेसाठी एकत्रितपणे केल्या जाणाऱ्या लष्करी प्रयत्नांवर भर देत पुढे नेण्याचा प्रस्ताव बहरीनने ठेवला होता. ११ देशांनी या प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले.अनेक आठवडे चर्चा केल्यानंतर पहिल्या परिशिष्टातील ८व्या कलमान्वये (लष्करी बळाचा वापर) हा प्रस्ताव ठेवला गेला होता.

---

## जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी करिष्मा नायर यांची नियुक्ती

जन सम्राट टाईम्स

जळगाव : जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पदावर करिष्मा नायर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तरुण, अभ्यासू आणि कार्यक्षम आयएएस अधिकारी म्हणून ओळख असलेल्या नायर यांच्या नियुक्तीमुळे जिल्हा प्रशासनात नव्या उर्जेची भर पडणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तरुण वयात मोठी जबाबदारी २७ नोव्हेंबर १९९७ रोजी जन्मलेल्या करिष्मा नायर या महाराष्ट्र केडरच्या २०२१ च्या तुकडीतील भारतीय प्रशासकीय सेवा (IAS) अधिकारी आहेत. अत्यंत कमी



वयात त्यांनी प्रशासनातील महत्त्वाची जबाबदारी स्वीकारत आपल्या क्षमतेची छाप पाडली आहे. शैक्षणिक पार्श्वभूमी भक्कम नायर यांनी फॉरेन्सिक सायन्स या विषयात बी.एस्सी. पदवी संपादन केली आहे. त्यांच्या शैक्षणिक पार्श्वभूमीमुळे निर्णय प्रक्रियेत वैज्ञानिक दृष्टीकोन आणि तर्कशुद्ध विचारांचा वापर करण्याची क्षमता त्यांच्यात विकसित झाली आहे. नाशिक महापालिकेतील अनुभव सध्या त्या नाशिक महानगरपालिका येथे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त म्हणून कार्यरत होत्या. २ एप्रिल २०२५ रोजी त्यांनी या पदाची जबाबदारी स्वीकारली होती. या काळात त्यांनी शहर विकास, प्रशासनिक सुधारणा आणि नागरिकाभिमुख उपक्रमांमध्ये सक्रिय भूमिका बजावली. प्रशासकीय कारकिर्दीतील अनुभव नायर यांनी यापूर्वी प्रकल्प अधिकारी तसेच सहायक जिल्हाधिकारी म्हणूनही काम पाहिले आहे. विविध स्तरांवरील प्रशासनाचा अनुभव असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजात प्रभावी निर्णय घेण्यास त्यांना मदत होणार आहे. विकासाला गतीची अपेक्षा जळगाव जिल्हा परिषद ही ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांशी संबंधित महत्त्वाची यंत्रणा आहे. अशा परिस्थितीत तरुण आणि गतिमान अधिकाऱ्याच्या रूपाने करिष्मा नायर यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील विकासकामांना नवी गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

करिष्मा नायर यांच्या नियुक्तीमुळे जळगाव जिल्हा परिषदेला सक्षम नेतृत्व मिळाले असून, त्यांच्या कार्यशैलीमुळे पारदर्शक, प्रभावी आणि लोकाभिमुख प्रशासनाची दिशा अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

---

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## भूम नगरपरिषदेत रस्ते घोटाळ्याचा संशय

### हायकोर्टाचा दणका, ५० कोटींचे देयक रोखले

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** भूम नगरपरिषदेत रस्त्यांच्या कामांमध्ये मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचा संशय व्यक्त करत दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने कडक भूमिका घेतली आहे. न्यायालयाने संबंधित ठेकेदाराला देय असलेली सुमारे ५० कोटी रुपयांची रक्कम तातडीने रोखण्याचे आदेश देत राज्य सरकार आणि नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना नोटीस बजावली आहे. याचिकेत करण्यात आलेल्या आरोपांनुसार, शहरातील अनेक रस्ते केवळ ६ ते ८ महिन्यांपूर्वी किंवा दोन वर्षांच्या आतच पूर्ण झाले असून ते अद्याप चांगल्या स्थितीत आहेत. असे असतानाही त्याच रस्त्यांवर पुन्हा कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्याचा घाट घालण्यात आला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यामुळे सरकारी निधीचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असल्याचा गंभीर मुद्दा न्यायालयासमोर मांडण्यात आला. प्रशासक आणि शहर अभियंता यांनी संगनमत करून जुन्याच रस्त्यांची नावे बदलून नवीन



प्रस्ताव सादर केल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. या प्रक्रियेत रस्त्यांची खरी स्थिती लपवून शासनाची दिशाभूल करण्यात आल्याचेही म्हटले आहे. निधी मंजूर करून घेण्यासाठी चुकीची माहिती सादर करण्यात आली असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

### न्यायालयाचे स्पष्ट निर्देश

न्या. विभा कंकणवाडी आणि न्या. वेणेगावकर यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधित ठेकेदाराला देय असलेली ५० कोटी रुपयांची रक्कम रोखण्याचे आदेश दिले. तसेच, ज्या रस्त्यांवर अलीकडेच काम झाले आहे, त्यांच्यासाठी पुन्हा शासन निर्णय (GR) कसा काढण्यात आला, याबाबत सविस्तर स्पष्टीकरण देण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले आहेत.

---

## जळगाव ग्रामीण प्रीमियर लीगमध्ये नानाश्री फाऊंडेशन संघाची दिमाखदार कामगिरी !

जन सम्राट टाईम्स

जळगाव : ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाडूंना चालना मिळावी म्हणून नुकत्याच घेण्यात आलेली जळगाव ग्रामीण प्रीमियर लीगचे दुसरे पर्व मोठ्या उत्साहात संपन्न झाले असून या स्पर्धेत किरणदादा पाटील युवा मंच सतखेडा या संघाने विजेतेपद मिळवले. मात्र या स्पर्धेत आपल्या सांघिक कामगिरीच्या जोरावर एका संघाने सगळ्यांची मन जिंकत दिमाखदार कमिगिरी केली. नानाश्री फाऊंडेशन या संघाने या स्पर्धेत आपल्या अफलातून फटकेबाजीने सगळ्या क्रिकेटप्रेमीची मन जिंकत स्पर्धेचे तिसरे बक्षीसही पटकावले.

जळगाव ग्रामीण स्पोर्टस् फाऊंडेशन यांच्यामार्फत 1 ते 5 एप्रिल दरम्यान शहरातील शिवतीर्थ मैदानावर जळगाव ग्रामीण प्रिमियर लीगचे दुसरे पर्व संपन्न झाले.स्पर्धेत जिल्हा मार्केटींग फेडरेशनचे संचालक शांताराम सोनवणे तथा युवासेनेचे स्वप्निल सोनवणे यांच्या मालकीच्या नानाश्री फाऊंडेशन संघाने किरण पाटील यांच्या नेतृत्वात सांघिक कामगिरी केली.नानाश्री फाऊंडेशन संघाने सांघिक कामगिरीच्या जोरावर चंद्रावर्षा इंटरप्रायजेस संघाचा 9 बळी राखत एकतर्फी असा विजय मिळवत स्पर्धेचा विजयी शुभारंभ केला.

---

## "माज करू नका, नाहीतर देव उचलून नेईल!" – नितीन गडकरींची कार्यकर्त्यांना सुनावणी

जन सम्राट टाईम्स

नागपूर : भारतीय जनता पक्षाच्या ४६व्या स्थापना दिनानिमित्त नागपूरात झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कार्यकर्त्यांना स्पष्ट आणि कडक शब्दांत कान टोचले. सत्ता, पद आणि खुर्ची मिळाल्यानंतर अहंकार वाढू देऊ नका, अन्यथा त्याचे परिणाम भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला. "जो खुर्चीवर बसला आहे तो एक दिवस उठणारच आहे. आणि



जर नाही उठला, तर देव त्याला घेऊन जाईल," अशा थेट शब्दांत गडकरी यांनी सत्तेतील माजावर प्रहार केला.

त्यांच्या या विधानाने कार्यक्रमात एकच खळबळ उडाली. गडकरी यांनी आपल्या भाषणात पक्षाच्या वाढीत कार्यकर्त्यांचे महत्त्व अधोरेखित केले. नेतृत्व हे वरून लादलेले नसून कार्यकर्त्यांतूनच घडायला हवे, असे ते म्हणाले. "नेतृत्वाच्या पोटातून नेतृत्व जन्माला येऊ नये, ते कार्यकर्त्यांतून घडले पाहिजे," असे सांगत त्यांनी पक्षातील लोकशाही प्रक्रियेवर भर दिला. कार्यकर्त्यांच्या मानसिकतेवर भाष्य करताना गडकरी म्हणाले, "काही जणांना दिवसरात्र फक्त निवडणुका आणि स्वतःची संधी दिसते. 'मला एक संधी द्या' हा त्यांचा टाहो असतो.

---

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## भीती अन् लैंगिक शोषण... खरातचा भयानक चेहरा उघड

### SITच्या खुलाशाने खळबळ ; श्रद्धेचा गैरफायदा घेऊन महिलांना जाळ्यात अडकवले

जन सम्राट टाईम्स


**मुंबई :** भोंदू अशोक खरात प्रकरणात विशेष तपास पथकाने (SIT) केलेल्या तपासातून धक्कादायक बाबी समोर आल्या असून, आरोपीचा सर्वात भयानक चेहरा उघड झाला आहे. SIT प्रमुख आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांनी पत्रकार परिषद घेऊन तपासातील महत्त्वाचे खुलासे केले. सातपुते यांनी सांगितले की, या प्रकरणाचा तपास २० मार्चपासून SITकडे सोपविण्यात आला असून सध्या एकूण ११ गुन्ह्यांचा तपास पथकाकडून सुरू आहे. या तपासासाठी दोन पोलीस उपअधीक्षकांसह एकूण २४ अधिकाऱ्यांचे विशेष पथक कार्यरत आहे. नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांमध्ये अशोक खरातविरोधात एकूण १२ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यापैकी ९ गुन्ह्यांचा तपास SIT करत असून उर्वरित गुन्ह्यांचा तपास स्थानिक पोलिसांकडे सुरू आहे. तसेच काही संबंधित गुन्ह्यांचाही तपास SITकडे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी खरात हा पीडितांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत त्यांना जाळ्यात अडकवत होता. "तो महिलांना दैवी शक्ती असल्याचा भास देत असे. खडे, चिंचोके, पूजा-विधी यांच्या नावाखाली पैसे उकळत होता," अशी माहिती सातपुते यांनी दिली. त्याचबरोबर आरोपी महिलांना त्यांच्या कुटुंबीयांच्या



मृत्यूची भीती दाखवत असे. बदनामीची धमकी देऊन त्यांच्यावर मानसिक दबाव निर्माण करत आणि त्यातूनच लैंगिक शोषण करत असल्याचेही तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणातील गुन्ह्यांपैकी ८ गुन्हे महिला लैंगिक अत्याचाराशी संबंधित असून उर्वरित प्रकरणांमध्ये फसवणूक, सावकारी आणि अंधश्रद्धा विरोधी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल आहेत. आतापर्यंत ३० हून अधिक साक्षीदारांची चौकशी करण्यात आली आहे. याशिवाय, ईशानेश्वर मंदिर परिसरात अंधाराचा फायदा घेत हातचलाखीने स्वतःकडे दैवी शक्ती असल्याचे भासवून समाजात अंधश्रद्धा पसरवण्याचे काम आरोपी करत होता, असेही तपासातून निष्पन्न झाले आहे. एकूणच, या प्रकरणातील तपासातून समोर आलेल्या माहितीमुळे समाजात मोठी खळबळ उडाली असून, पुढील काळात आणखी गंभीर बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### पूजा-विधी यांच्या नावाखाली उकळत होता पैसे

नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांमध्ये अशोक खरातविरोधात एकूण १२ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यापैकी ९ गुन्ह्यांचा तपास SIT करत असून उर्वरित गुन्ह्यांचा तपास स्थानिक पोलिसांकडे सुरू आहे. तसेच काही संबंधित गुन्ह्यांचाही तपास SITकडे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी खरात हा पीडितांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत त्यांना जाळ्यात अडकवत होता. "तो महिलांना दैवी शक्ती असल्याचा भास देत असे. खडे, चिंचोके, पूजा-विधी यांच्या नावाखाली पैसे उकळत होता," अशी माहिती सातपुते यांनी दिली.



## प्रबोधनकार ठाकरे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# दोन युगपुरुषांचे नाते!

## समांतर वाटांवरचे दोन क्रांतिकारक

*विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात दोन असे व्यक्तिमत्त्व होते, जे वेगवेगळ्या मार्गांनी एकाच ध्येयासाठी लढत होते, जातिव्यवस्थेचा नाश आणि बहुजन समाजाची मुक्ती. एक होते केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे — सत्यशोधक विचारांचे धगधगते प्रवक्ते, लेखक, वक्ते आणि समाजसुधारक. दुसरे होते डॉ. भीमराव रामजी आंबेडकर — जगाच्या व्यासपीठावर दलित मुक्तीची मशाल पेटवणारे महामानव. या दोन युगपुरुषांच्या नात्याचा इतिहास म्हणजे केवळ राजकीय भेटींचा लेखाजोखा नाही, तो वैचारिक, सामाजिक आणि मानवी पातळीवरील एका दीर्घ सहप्रवासाची कहाणी आहे.*



### प्रबोधनकारांची वैचारिक पार्श्वभूमी

प्रबोधनकार ठाकरे हे मूळचे चांद्रसेनीय कायस्थ प्रभू (सीकेपी) समाजातील. पण जातीची बंधने त्यांना कधीच मान्य नव्हती. महात्मा जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक विचारांनी त्यांना प्रारंभापासूनच झपाटले होते. त्यांनी "प्रबोधन" हे नियतकालिक चालवले, ज्यात ब्राह्मणशाही, भिक्षुकशाही, अंधश्रद्धा आणि जातिव्यवस्था यांच्यावर अत्यंत आक्रमक लेखन केले. त्यांच्या या लेखनशैलीमुळेच त्यांना "प्रबोधनकार" ही पदवी मिळाली. ते केवळ लिहित नसत ते प्रत्यक्ष कृतीही करत असत. बाल-जरठ विवाहाच्या विरोधात उघड आव्हान, हुंडाविरोधी चळवळ, मंदिर प्रवेशाच्या प्रश्नांवर भूमिका, हे सारे त्यांच्या कृतिशील स्वभावाचे दाखले होते. हाच स्वभाव त्यांना डॉ. आंबेडकरांच्या जवळ आणत होता.

### दादर गणेशोत्सवाचा ऐतिहासिक प्रसंग — १९२६

प्रबोधनकार आणि डॉ. आंबेडकर यांच्या नात्याचे सर्वात ठळक आणि ऐतिहासिक उदाहरण म्हणजे १९२६ सालचा दादर गणेशोत्सव प्रसंग. हा प्रसंग महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात एक मैलाचा दगड ठरला.

### प्रसंग काय होता?

दादरच्या गणेशोत्सवात ब्राह्मणेतर समाजाचा आग्रह होता की, गणपतीची पूजा एखाद्या अस्पृश्य व्यक्तीच्या हातून व्हावी. मात्र गणपती मंडळाचे ब्राह्मण पुढारी हे मान्य करण्यास अजिबात तयार नव्हते. हे पाहून प्रबोधनकार ठाकरे यांनी त्यांच्या स्वभावाला साजेसे पाऊल उचलले. मार्ग काढला नाही, तर मी गणपती फोडून टाकेन, असा बॉम्ब प्रबोधनकारांनी टाकला. हे विधान म्हणजे केवळ रागाच्या भरातले बोलणे नव्हते, ते एका समाजसुधारकाचे ठाम आव्हान होते. जातिव्यवस्थेने कुचंबलेल्या समाजाला मंदिरात आणि उत्सवात समान स्थान मिळाले नाही, तर असा उत्सव कशासाठी? हाच त्यांचा प्रश्न होता.

### डॉ. आंबेडकरांची मध्यस्थी

त्यानंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रावबहादूर बोले यांच्या मध्यस्थीमुळे दलित नेते मडकेबुवांच्या हातची फुले ब्राह्मण पुजारी प्रत्यक्षात देवाला वाहील, असा मार्ग निघाला. हा तोडगा म्हणजे एक ऐतिहासिक तडजोड होती. दलित व्यक्तीच्या हाताने आणलेली फुले देवाच्या पायी वाहणे, हे त्या काळातील कठोर जातिव्यवस्थेच्या चौकटीत एक छोटेसे पण क्रांतिकारक पाऊल होते. डॉ. आंबेडकरांनी या प्रसंगी शांत पण प्रभावी मध्यस्थाची भूमिका बजावली, जी त्यांच्या व्यावहारिक समंजसपणाची साक्ष देते.

### गणेशोत्सव बंद — नवरात्रोत्सवाचा जन्म

पुढच्या वर्षीपासून दादरचा गणेशोत्सव बंद पडला. प्रबोधनकारांनी गणपती बंद पाडला असा आरोप होऊ लागला. मात्र प्रबोधनकारांनी डगमगले नाहीत. 'लोकहितवादी संघ' ही संस्था स्थापन करून दादरला, आजच्या टिळक पुलाजवळच्या एका मैदानात सार्वजनिक नवरात्रोत्सव साजरा झाला.




गुजराती गरबे आणि बंगाली दुर्गापूजा हे आधीपासून असतीलही, पण मूर्ती आणून देवीची महाराष्ट्रीय पद्धतीची नवरात्री सुरू करण्याचे श्रेय प्रबोधनकारांचेच. पालघरपासून कुलाब्यापर्यंतचा ब्राह्मणेतर समाज या उत्सवात सामील झाला. पुढच्याच वर्षी हा उत्सव संपूर्ण महाराष्ट्रात पसरला. आजही हा उत्सव दादरच्या खांडके चाळीत सुरू आहे, प्रबोधनकारांच्या कर्तृत्वाची ती जिवंत आठवण आहे. या संपूर्ण प्रसंगात डॉ. आंबेडकरांनी जी भूमिका बजावली, ती केवळ मध्यस्थाची नव्हती, ती एका समान विचाराच्या सहप्रवाशाची भूमिका होती.

### वैचारिक साम्य : दोन भिन्न मार्ग, एकच ध्येय

महात्मा फुलेंचा वारसा प्रबोधनकार आणि डॉ. आंबेडकर — दोघेही महात्मा जोतीराव फुले यांना आपले प्रेरणास्रोत मानत होते. फुलेंची सत्यशोधक चळवळ ही दोघांसाठीही वैचारिक पायाभरणी होती. महात्मा फुले यांच्या सत्यशोधनाचा विचार पुढे नेणारे आक्रमक विचारवंत, भिक्षुकशाहीचा कर्दनकाळ ठरलेले समाजसुधारक, असे प्रबोधनकारांचे वर्णन केले जाते, जे डॉ. आंबेडकरांशी असलेल्या त्यांच्या वैचारिक नात्याचे मूळ स्पष्ट करते.

### जातिव्यवस्थेविरुद्ध समान भूमिका

दोघांचाही ब्राह्मणशाहीला विरोध होता, मात्र, त्याचे स्वरूप वेगळे होते. प्रबोधनकारांनी "खरा ब्राह्मण" या नाटकातून जातिव्यवस्थेवर सामाजिक प्रहार केला. महाराची सावली पडली तर माणूस महार होतो, मग ब्राह्मणाची सावली पडली तर तो ब्राह्मण होतो काय, अशी खोचक प्रश्न विचारण्याची परंपरा त्यांना त्यांच्या आजीकडून मिळाली होती, जी त्यांनी आयुष्यभर जपली. दुसऱ्या बाजूला डॉ. आंबेडकरांनी महाड चवदार तळे सत्याग्रह (१९२७) आणि काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह (१९३०) यांद्वारे जातिव्यवस्थेला थेट आव्हान दिले. प्रबोधनकारांनी या आंदोलनांना नैतिक पाठिंबा दिला.

### "प्रबोधन" आणि आंबेडकरी विचार

प्रबोधनकारांनी आपल्या "प्रबोधन" नियतकालिकातून अनेकदा डॉ. आंबेडकरांच्या भूमिकांना पाठिंबा दिला. शाहू महाराजांच्या प्रेरणेने सर्वत्र संचार करणारे सत्यशोधक जलसे आणि प्रबोधनकारांसारख्या काही लेखकांचे आक्रमक लेखन, यामुळे शहरापुरता मर्यादित असलेला सत्यशोधक विचार महाराष्ट्रातील बहुजन समाजापर्यंत पोहोचला, हे त्या काळातील परिवर्तनाचे चित्र स्पष्ट करते.

### व्यक्तिगत स्नेह : "माझी जीवनगाथा"तील पाऊलखुणा

प्रबोधनकारांनी आपल्या "माझी जीवनगाथा" या आत्मचरित्रात अनेक प्रसंगांचे हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. गोव्यापासून नागपूरपर्यंत सर्व महाराष्ट्र पायाखाली घालून महाराष्ट्रातील समाजाचे प्रत्यक्ष निरीक्षण केलेल्या महाराष्ट्राच्या एका पराक्रमी पुत्राच्या या आठवणी आहेत. त्यात डॉ. आंबेडकरांबद्दलचे उल्लेख हे आदर आणि जिव्हाळ्याने भरलेले आहेत. दोघांमधील हे नाते केवळ विचारांचे नव्हते, ते माणसाचे माणसाशी असलेल्या आदराचेही होते. एका सत्यशोधकाने दुसऱ्या क्रांतिकारकाला ओळखणे आणि त्याचे कार्य उचलून धरणे, हेच या नात्याचे खरे सौंदर्य होते.

### ऐतिहासिक महत्त्व : एका नात्याचे मोल

प्रबोधनकार ठाकरे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाते महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण पहिले — एका सवर्ण समाजातील नेत्याने दलित मुक्तीच्या आंदोलनाला उघड पाठिंबा देणे, हे त्या काळात धाडसाचे होते. दुसरे — दादर गणेशोत्सव प्रसंगाने हे दाखवून दिले की, धार्मिक सण हे जातीय भेदांचे व्यासपीठ बनू नये, हा संदेश दोघांनीही एकत्र दिला.

तिसरे — बहुजनांचे कैवारी म्हणून ओळखले जाणारे प्रबोधनकार आणि दलितांचे नेतृत्व करणारे डॉ. आंबेडकर यांच्या एकत्र येण्याने महाराष्ट्रात बहुजन ऐक्याचा एक वेगळा संदेश गेला. चौथे — महाराष्ट्रभर सातत्याने फिरून विद्रोहाची पेरणी करणारे प्रबोधनकार आणि अस्पृश्यतेविरुद्ध कायदेशीर व सामाजिक लढा देणारे डॉ. आंबेडकर या दोघांनी मिळून महाराष्ट्रातील सामाजिक जागृतीची एक समृद्ध परंपरा निर्माण केली. *आज दोन महापुरुषांच्या विचारांना आठवतो, तेव्हा ..." प्रबोधनकार ठाकरे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाते म्हणजे दोन क्रांतिकारकांचा एक सामायिक संकल्प होता — माणसाला माणसाचा दर्जा मिळाला पाहिजे. दादरच्या त्या गणेशोत्सवातील एक प्रसंग हे नाते किती खोल आणि कृतिशील होते, याची साक्ष देतो. ब्राह्मण पुजाऱ्याच्या हाताने दलित नेत्याच्या फुलांना देवाच्या पायी स्थान मिळवून देणे, हे कदाचित एकाला छोटे वाटेल, पण त्या काळाच्या संदर्भात ते एक महाक्रांती होती.

आज या दोन महापुरुषांच्या विचारांना महाराष्ट्र आठवतो, तेव्हा लक्षात ठेवायला हवे की, जाती तोडण्याचे आणि जोडण्याचेही काम केवळ एका जातीतून येत नाही. ते येते माणसाच्या हृदयातून आणि प्रबोधनकार ठाकरे हे त्याचे जिवंत उदाहरण होते.